# वाढदिवस बाबांचा

"राजन, आंघोळ झाली? चांगले बाहेर जायचे कपडे घाल." आकृतीने सांगितले.
"आई, कुठे बाहेर जायचं ?”
"नाही, तुझ्या बाबांचा वाढदिवस आहे. मामा, मामी, आजी येणार आहेत. मी बासुंदी पुरीची ऑर्डर गुलाटीला दिली आहे, शिवाय सामोसे पण सांगितले आणि स्वागतला पुलाव आणि दहीवडे सांगितले आहेत. मोठी पार्टी करू आपण."
“आजी - बाबांची आई पण येणार का? बाबांच्या वाढदिवसाला तिचे महत्त्व मोठे नाही का? तिने त्याMना जन्म दिला आहे."
“पुरे तुझे तत्वज्ञान. मला शहाणपण शिकवू नकोस. सांगितले ते ऐक."

आकृतीला कधीच सासूशी जमवून घेता आलेच नाही. ती नेहमी तिच्या आईच्या सांगण्यावरून सासूशी वादच घालत राहिली. सुबोध, तिचा नवरा, शांत. त्याला घरात वाद नको असत. म्हणून तो तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करायचा. आणि आपल्याला योग्य वाटेल तेच करायचा. त्याचे आई मालती, वडील वासुदेव, बहीण सुचित्रा व भाऊ सुरेश असे पाच जणांचे आनंदी, शिस्तीचे कुटुंब होते. आई बाहेर नोकरी करत नव्हती. संसार आटोपशीरपणे करत होती. मुलांना योग्य वळण होते. आपला अभ्यास सांभाळून आपली सर्व कामे त्यांची त्यांनीच करावी, असा तिचा कटाक्ष असे. तिला आळशीपणा आवडत नसे. सुचित्राला तिने स्वयंपाकाचे ही ट्रेनिंग दिले होते. त्यामुळे आता लग्न करून अमेरिकेला गेली तरी तिला कठीण गेले नाही.. सुचित्रा कॉम्प्युटर इंजिनिअर झाली. नोकरीला लागली पण आईला मदत करायला नेहमीच तयार असायची.. त्याउलट आकृती, आपण नोकरी करतो म्हणजे फार मोठे काम करतोय असा समज. घरातले सर्वजण आपला पगार आईकडे देत. मग आई त्यातले काही पैसे घरखर्चाला ठेवून बाकीचे त्यांना खर्चासाठी व बचत करावी यासाठी देत असे. पण आकृती आपला पगार स्वतःकडेच ठेवी. एरवी सासूला मदत करणे तिला कधी जमलेच नाही. आपले व नवऱ्याचे कपडे ती इस्त्रीवाल्याकडे देई. बाकीचे सर्वजण सवयीप्रमाणे आपले आठवड्याचे कपडे धुऊन व इस्त्री करून ठेवत..

राजन झाला तेव्हा दीड महिना बाळंतपणासाठी माहेरी राहिली. पण ऑफिस सुरू झाल्यावर लगेच सासरी आली. आजी-आजोबांना काही नातू जड नव्हता. पण ते सर्वतोपरी त्याला सांभाळतात याबद्दल तिला थोडीही कृतज्ञता नव्हती. फक्त आपली आई व तिचा मोठेपणा. त्यांच्याकडची कौतुके हिच्या पैशावरच चालत हे सुबोधला माहीत होते. पण तिच्याशी वाद करून घरची शांती घालवायची त्याची इच्छा नसे. सुचित्रा अमेरिकेला लग्न करून गेली व सुदेशही नोकरीसाठी अमेरिकेला गेला..

बाबा आई व्यवस्थित होते. राजन पाचवीत गेला. बाबा त्याचा अभ्यास घ्यायचे. आई पण घरी मुलांना गणिताच्या ट्युशन्स द्यायची. तिची पूर्वीपासूनच ती सवय होती. शिकवणीचे पैसे अचानक आलेल्या खर्चाची नड भागवायला उपयोगी पडत. एक दिवस बाबांना हार्ट अटॅक आला, तो जीवघेणा ठरला. चांगला धडधाकट माणूस अचानक मृत्युमुखी पडला. त्यामुळे आईच्या मनावर भलताच परिणाम झाला. ती पूर्ण मिटून गेली. अशावेळी घरातल्यांनी, खास करून सुनेने लेकीच्या मायेने तिला बोलते करायचे. ती कशी नेहमीसारखी होईल ते बघायचे. तर आकृतीने तिला वेडी ठरवले. तिची देखभाल करण्याऐवजी तिला वृद्धाश्रमात ठेवा म्हणून सुबोधचा पिच्छा पुरवला. आईच्या काही मैत्रिणी तिला भेटायला आल्या होत्या. त्या एका ज्येष्ठ धामात रहात होत्या.. तिची अवस्था पाहून त्यांना वाईट वाटले. हीच का आपली, हुशार कर्तृत्त्ववान मैत्रीण, असे त्यांना झाले. त्यांनी सुबोधला, त्यांना थोडे दिवस आमच्याकडे पाठव, आमच्यात राहून ती मोकळी होईल असे सुचवले. आकृतीची आई तर तिला म्हणाली, तू नोकरीला जाणार आणि ही तुझी सासू वेडेपणात घर उघडे टाकून कुठे गेली तर काय करणार? घरात चोर शिरले तर सर्व घर रिकामे करतील. त्यापेक्षा तिला वेड्यांच्या इस्पितळात ने. सुबोधला आकृतीने आईचा विचार सांगितला. आणि तो किती बरोबर आहे हे पटवत राहिली. शेवटी सुबोधने आपल्या आईच्या मैत्रिणींशी विचारविनिमय करून तिला त्यांच्या कडे नेले. त्यांचे सखीधाम होते. प्रमुख त्यांचीच मैत्रीण सुमतीताई होती. दर महिन्याला ठराविक रक्कम सर्वजणी देत. व छान मिळून मिसळून राहात. सुबोधने पैसे भरले व आईला तिथे ठेवले त्याला. आताच सात-आठ महिने झाले होते. तो नेहमी फोन करून आईची खबर घ्यायचा. पण त्याचे प्रमोशन नुकतेच झाल्यामुळे ऑफिसचे काम खूप वाढले होते. त्यामुळे रविवारी आईला जाऊन भेटावे असे वाटले तरी त्याला जमत नव्हते.

आज रविवार.. आपला वाढदिवस. आईच्या आशीर्वादाशिवाय वाढदिवसाला काय अर्थ. असे त्याला वाटले. तो आंघोळ करून व्यवस्थित कपडे करून बाहेर आला आणि आकृतीला म्हणाला, "जरा काम आहे मी बाहेर जाऊन येतो." राजन पटकन म्हणाला, "बाबा बाहेर जात आहेस? मला जरा मित्राकडे सोडाल?" तो हो म्हणाला. दोघे निघाले तशी आकृती म्हणाली, "लवकर या. छान मेनू आहे जेवायला. तुमची खास आवडती बासुंदी पुरी." सुबोध मनात म्हणाला गुलाटीच्या दुकानची.. स्वतःला हिला कधीच काही करता येत नाही. स्वयंपाकीण, मोलकरणी टिकवता येत नाहीत. सर्वांना वाटेल तसे बोलायचे.. घरचे वाद नको म्हणून गप्प रहातात. नोकर लोक काम सोडून जातात.. असो. तो निघाला. राजन गाडीत त्याच्या शेजारी बसत म्हणाला, "बाबा किती दिवस झाले आजी भेटली नाही. तिच्याकडे जाऊ या का? मला तिची फार आठवण येते. तू तिथेच निघाला आहेस ना?" सुबोधला लेकाचा अभिमान वाटला. कौतुक वाटले. तो म्हणाला, "हो तिच्याकडे जातोय." दोघे निघाले.. रविवार असल्याने ट्राफिक नव्हता. तासाभरात सखीधामला पोहोचले. सुमतीताईने त्यांना बघितले व हसत दार उघडले आणि या या म्हणत स्वागत केले.. बरोबर वेळेला आलात असे म्हणून आत मध्ये आवाज

दिला. दोन पाहुणे आलेत. दोन ताटे जास्त घ्या. जेवायची वेळ झाली होती व आतमध्ये टेबलावर जेवणाची व्यवस्था चालू होती.. दोघेही आत गेले. राजन आजी कुठे म्हणून शोधत होता. सुबोधचे. डोळेही आईला शोधत होते. एवढ्यात सुमतीताई म्हणाल्या, आज रविवार. गोडाचा पदार्थ करायचा. तेव्हा मालतीने आज बासुंदी पुरीचा बेत केला आहे.. तुम्ही आलात ते बरे झाले. सर्व जण जेवायला बसले. तेव्हा मालती तबकात निरांजन, हळदीकुंकू, तांदूळ घेऊन आली. तिने हातातली अंगठी काढून तबकात ठेवली. आणि सुबोधकडे आली. तिने सुबोधला कुंकू लावून औक्षण केले व ओवाळले. राजन बघत राहिला. त्याला आजोबा असतानाची आठवण झाली. आजी नेहमी बाबांच्या वाढदिवसाला व आपल्या वाढदिवसाला असेच ओवाळायची. आईला असले काही करताच येत नाही. आजीने आज बाबांचा वाढदिवस म्हणून एवढ्या सर्वांसाठी बासुंदी पुरी स्वतः बनवली. आईने दुकानातून मागवली. सर्व जण जेवायला बसले.. मालतीला राजन आणि सुबोधच्या मध्ये सुमतीने मुद्दाम बसायला लावले.

मालती आता नॉर्मल झाली होती. सुबोध, राजनला आपली आई, आजी भेटल्याचा आनंद झाला. बराच वेळ दोघे तिच्या खोलीत बसून गप्पा मारत होते. सुबोधने फोन बंद ठेवला होता. त्याला आकृतीची कटकट मध्ये नको होती.. आईशी बोलून सुबोधला खूप बरे वाटले. त्याने सुमती मावशींकडे सखीधाम साठी पाच हजार रुपये दिले. माझ्या वाढदिवसानिमित्त असे सांगितले. ते पाहून मालतीला लेकाचा अभिमान वाटला. दोघेही आरामात घरी आले. घरी आकृती आणि तिची माहेरची माणसे जेवून खाऊन आरामात बसली होती. या दोघांनी त्यांना काहीच सांगितले नाही. राजनला बाबांचा वाढदिवस खूप आवडला.

**नलिनी करंडे**